# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

**राज्यातील ग्रामीण भागात गुंठेवारी नियमितीकरणाची कार्यवाही ठप्प झाल्याबाबत**

**(१) १९८९ (२२-१२-२०१४). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधिन करणे श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २०११ नुसार गुंठेवारी नियमितीकरणाची कार्यवाही पूर्ण करएयाकरिता ग्रामीण भागाकरिता नियोजन प्राधीकरण म्हणून घोषित केलेल्या उपविभागीय स्तरावर मुदतवाढीचे आदेश पारीत करण्यात आलेले नसल्यामुळे कोल्हापूरसह इतर जिल्हयातील ग्रामीण भागातील गुंठेवारीची कार्यवाही ठप्प झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधिन करणे श्रेणीवाढ व नियत्रंण) अधिनियम, २०११ नुसार गुंठेवारी नियमितीकरणाची कार्यवाही पूर्ण करण्याचे आदेश मा. मंत्री, महसूल यांनी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-१०-२०१८) :** (१), (२), (३) व (४) तत्कालिन मा. मंत्री (महसूल) यांनी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना दिनांक.०४/१०/२०१३ रोजीच्या मार्गदर्शनपर दिलेल्या पत्रामध्ये उप विभागीय अधिकारी यांना गुंठेवारी प्रकरणापुरते ग्रामीण भागासाठी स्थानिक नियोजन प्राधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यासंदर्भात आवश्यक त्या सूचना शासनाकडून देण्यात येतील, तोपर्यंत पात्र गुंठेवारी नियमन प्रकरणामध्ये शासनाच्या आदेशाची प्रतिक्षा न करता कार्यवाही करण्यात यावी असे नमूद केले आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी त्यांच्या दिनांक ०२/११/२०१३ च्या पत्रान्वये जिल्हयातील सर्व उपविभागीय अधिकारी यांना महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे श्रेणीवाढ व नियंत्रण ) अधिनियम, २००१ यातील तरतूदीनुसार दिनांक ०१/०१/२००१ रोजी अस्तित्वात असलेले सर्व गुंठेवारी विकास प्राप्त प्रस्तावाबाबत दिनांक ३०/०४/२०१४ पर्यंत कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या होत्या. तसेच त्यानंतर

जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी दिनांक २९/०३/२०१५ च्या आदेशान्वये गुंठेवारी विकास प्रस्ताव वरीलप्रमाणे निकाली काढण्याची मुदत सदर आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांकरिता वाढविली व त्यापुढे मुदतवाढ देण्याबाबतची कार्यवाही उप विभागीय अधिकारी यांचे स्तरावर करण्याबाबत सूचित केले आहे.

---

**मौजे दिवाणमान (ता.वसई, जि.पालघर) येथील जमिनीवर वसई-विरार महानगरपालिकेने केलेले अतिक्रमण**

**(२) ३९७१५ (१३-०५-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दिवाणमान (ता.वसई, जि.पालघर) येथील स.नं.१७६अ/१अ शासकीय मालकीच्या ४७.५० हेक्टर खाजगी जमिनीवर वसई-विरार महानगरपालिकेने निविदा मागवून भराव टाकल्याने एका राजकीय पक्षाच्या जिल्हा प्रमुखांनी दिनांक २२ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.महसूल मंत्री यांचेकडे लेखी तक्रार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने याप्रकरणी संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१८) :** (१), (२) व (३) वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील मौजे दिवाणमान येथील सर्वे नं.१७६अ/१अ मधील शासनाच्या मालकीच्या ४७.५० हे.आर.जमिनीवर वसई-विरार उपप्रदेशाच्या मंजूर विकास आराखड्यानुसार सदर जागेवर “दफनभूमी” व “क्रीडा संकुल” करीता जागेचा ताबा जिल्हाधिकारी, ठाणे यांनी महानगरपालिकेस ऑगस्ट,२०११ मध्ये दिला आहे. महानगरपालिकेने सदर मंजूर विकास आराखड्यामधील डी.पी.रस्ता (३० मीटर रुंद) विकसीत करण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कंत्राटदाराची नियुक्ती केली आहे. त्यानुसार कंत्राटदाराकडून सदर रस्त्यासाठी भराव करण्यात आला होता. तथापि, सदर प्रकरणी जनतेच्या तक्रारी तसेच मा.मुंबई उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका दाखल झाल्याने सदर रस्त्याचे काम बंद करण्यात आले आहे.

सर्वे नं.१७६अ/१अ या जागेवर रस्त्यासाठी ४३८० ब्रास मातीचा भराव केल्याचे निदर्शनास आल्याने तहसीलदार, वसई यांनी संबंधित कंत्राटदार व वसई-विरार महानगरपालिकेस दि.४/१०/२०१६ रोजी रु.१,०५,१२,०००/- इतक्या दंडात्मक रक्कमेचे आदेश पारित केले आहेत.

सदर प्रकरणी मा.मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल झाली असल्याने सदर रस्त्याचे काम बंद असल्यामुळे कंत्राटदारास अंतिम देयके प्रदान करण्यात आली नाहीत.

सदर कामाचे मोजमाप घेऊन संबंधित कंत्राटदाराच्या वसई-विरार शहर महानगरपालिकेकडून देय असलेल्या देयकातून स्वामीत्वधनाची रक्कम वसूल करुन शासनजमा करण्यात येईल, असे वसई-विरार महानगरपालिकेने तहसीलदार, वसई यांना कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुर्तिजापूर (जि.अमरावती) येथील रेल्वेगेट ते शिवाजी चौक व अकोला नाक्यापर्यंत असलेल्या मुख्य मार्गावरील दुभाजक काढण्याबाबत**

**(३) ५५७६९ (२४-०८-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुर्तिजापूर (जि.अमरावती) येथील रेल्वेगेट ते शिवाजी चौक व अकोला नाक्यापर्यंत असलेल्या मुख्य मार्गावरील दुभाजकमुळे वाहतुक व्यवस्था सुरळीत होण्याऐवजी अनेक अपघातास व जिवीतहानी होण्यास कारणीभूत ठरत असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मार्गावरील दुभाजक काढण्याची मागणी येथील नागरीकांनी केली आहे तसेच दुभाजक दिनांक १० मे पर्यंत न काढल्यास आंदोलन करण्याचा इशाराही नागरीकांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-११-२०१८) :** (१) हे खरे नाही,

सदर रस्त्यावर झालेले अपघात रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या दुभाजकामुळे झालेले नसून निष्काळजीपणे भरधाव वेगाने वाहन चालविल्यामुळे झालेले आहेत, असे पोलीस विभागाच्या अहवालावरुन निदर्शनास येते.
(२) होय.
(३) व (४) सदरील रस्ता लांबीतील विद्युत खांब हटविण्याबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, अमरावती यांना कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला यांचे दि. ११.१०.२०१८ च्या पत्रान्वये त्वरीत कार्यवाही करणे बाबत कळविण्यात आले आहे.

---

**राज्यातील वाळु तस्करांवर 'मोका' अंतर्गत कारवाई करण्याबाबत**

**(४) ७६६५६ (१२-०४-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वाळू तस्करांचे महसूल विभागातील कर्मचारी व अधिकाऱ्यांवर होणारे हल्ले वाढत असल्यामुळे वाळू तस्करांवर मोका कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे मा. महसूल मंत्री यांनी दिनांक २६ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार वाळू तस्करांवर मोका कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-१०-२०१८) :** (१) व (२) दि.१२ मार्च,२०१३ रोजीच्या वाळू/रेती निर्गती धोरणामध्ये वाळूचे अवैध उत्खनन, वाहतूक इत्यादीच्या अनुषंगाने दंडात्मक कारवाई करतांना महसूल अधिकारी/कर्मचारी यांच्यावर हल्ले होत असल्याचे निदर्शनास आल्यास व अशा ठिकाणी संघटित गुन्हेगारीचे प्रकार आढळून आल्यास अशा संघटित गुन्हेगारीविरुध्द "मोक्का" अधिनियमान्वये कारवाई करण्याचे सूचित करण्यात आले आहे.

तसेच राज्यातील वाळूच्या अवैध उत्खनन/वाहतूकीस परिणामकारक आळा घालण्यासाठी वाळूचे अवैध उत्खनन/ वाहतूक करणे, अशा कृत्यात सहभागी होणे, प्रोत्साहन देणे अशा व्यक्तींविरूध्द "महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेटस) यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१" अंतर्गत कारवाई करण्यासाठी, सदर अधिनियमात शासन अधिसूचना, दि.२९ जानेवारी, २०१६ अन्वये सुधारणा करण्यात येऊन "वाळू तस्कर" ही संज्ञा समाविष्ट करण्यात आली आहे. त्यानुसार क्षेत्रीय पातळीवर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील वाटप झालेल्या जमिनींच्या उताऱ्यांवर संबंधित शेतकऱ्यांची नावे लावण्याबाबत**

**(५) ७९७७७ (१२-०४-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील शासकीय जमिनीचे भूमिहीन शेतकऱ्यांमध्ये शासकीय नियमानुसार सन १९६०, १९६८,व १९७६ या वर्षी वाटप करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांनी या जमिनीवर खर्च व मशागत करून जमिनी लागवडीखाली आणल्या असून या जमिनीवर शेतसारा देखील आकारला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जमिनींच्या ७/१२ व ८अ च्या उताऱ्यावर क्षेत्र ०.०० असे दाखविले जात असल्यामुळे शेतकऱ्यांना सहकारी सोसायटी व बँका मार्फत कर्ज पुरवठा होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर जमिनींच्या उताऱ्यांवर पूर्वी प्रमाणे लागवडीलायक क्षेत्र म्हणून नावे लावण्यात यावी अशी मागणी संबंधित शेतकरी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे. नेवासा तालुक्यातील शासकीय जमिनीचे भुमिहीन शेतक-यांना शासकीय नियमानुसार सन १९६०, १९६८ व १९७६ मध्ये वाटप करण्यात आले आहे. सदरचे क्षेत्र हे गा.न.नं ७/१२ वरील नोंदी नुसार पोटखराब क्षेत्र आहे. क्षेत्र वाटप केलेल्या ६३९ लाभधारकांची नावे गा.न.नं ७/१२ वर नमूद असून त्यांच्या नावासमोर वाटप क्षेत्र दर्शविण्यात आलेले आहे.
(२) नेवासा तालुक्यात पोटखराब वाटप झालेल्या ६३९ गटापैंकी ४४३ गटांना तत्कालीन वाटप फेरफारावरून आकारणी लावलेली दिसत असून उर्वरीत १९६ गटांना वाटप फेरफार नोंदीमध्ये आकारणी लावलेली दिसून येत नाही.
(३) (४) व (५) महाराष्ट्र जमीन महसूल नियमपुस्तिका (खंड चार) मधील भाग (दोन) नुसार गा.न.नं ८-अ मध्ये संबंधित खातेदाराच्या लागवडीयोग्य क्षेत्राचा अंतर्भाव करता येतो. मात्र वाटप क्षेत्र पोट खराबा क्षेत्र असल्याने खातेदारांच्या गा.न.नं.८-अ मध्ये क्षेत्र निरंक दर्शविले होते. तथापि, गा.न.नं ७/१२ च्या गा.न.नं.७ मधील व गा.न.नं.८ मधील धारण क्षेत्रात साम्य ठेवण्यासाठी आता शासन निर्णय दि.१८ एप्रिल, २०१८ अन्वये गाव नमुना नं.८-अ मध्ये "पोटखराब क्षेत्र"चा रकाना समाविष्ट करण्याकरीता सुधारणा करण्यात आली आहे.त्यानुसार गाव नमुना नं.८-अ मधील स्तंभ क्र.३- धारण क्षेत्र या स्तंभात (३ब) "पोटखराब क्षेत्र" या उपस्तंभाचा समावेश करण्यात आलेला आहे.

तसेच लागवडीखाली आणलेल्या पोटखराब क्षेत्रास लागवडीखालील क्षेत्राच्या आकारणीच्या प्रमाणात अतिरिक्त आकारणीच्या अनुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरावर निर्बंध) नियम, १९६८ च्या नियम २(२) मधील सुधारणांकरीता नियमांचा मसूदा अंतिमत: दि.२९.०८.२०१८ रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तहसीलदार, पाचोरा (जि.जळगाव) यांनी केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करणेबाबत**

**(६) ८३३५० (१२-०४-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री.दिपक पाटील, तहसीलदार (ता.पाचोरा, जि.जळगाव) यांनी केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.महसूल मंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार शासनाने त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-१०-२०१८) :** (१), (२) व (३) यासंदर्भात शासनास निवेदन प्राप्त झाले आहे. उक्त निवेदनाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, पाचोरा यांनी केलेल्या चौकशीत तत्कालीन तहसीलदार, पाचोरा यांच्याकडून प्रशासकीय अनियमितता झाल्याची बाब सकृतदर्शनी निदर्शनास आली आहे. तदनुषंगाने सदर प्रकरणी चौकशी करुन अनियमिततेसंबंधी संबधितांवर जबाबदारी निश्चित करुन वस्तुनिष्ठ व स्वयंस्पष्ट प्रस्ताव सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त नाशिक यांना दि. २४/१०/२०१८ रोजीच्या पत्रान्वये निर्देश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खेड (जि.पुणे) तालुक्याच्या पश्चिम भागात विनापरवाना उत्खनन केल्याबाबत**

**(७) ८८४१३ (१२-०८-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : तारांकित प्रश्न क्रमांक १८८७६ ला दिनांक १३ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.पुणे) तालुक्याच्या पश्चिम भागात वर्ल्ड वाईड कंपनीने (पूर्वीची इनरकोन) पवनचक्या उभारताना विनापरवाना उत्खनन केल्याप्रकरणी शासनाने दिनांक २० डिसेंबर, २०११ रोजी कंपनीला ५ कोटी ९५ लाखाचा दंड केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त दंडाच्या रकमेपैकी किती रक्कम कंपनीने आत्तापर्यंत भरली आहे,
(३) असल्यास, सदर कंपनीवर कारवाई करून दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१८) :** (१) मौजे वांद्रा, वेल्हावळे, वहागाव व कुडे बु, तालुका खेड, जिल्हा पुणे येथील पवनऊर्जा प्रकल्पासाठी तयार करणेत आलेल्या रस्त्याचे कामासाठी इनरकॉन इंडिया लि., कंपनीने ३५०० ब्रास मुरुम/माती व डबराचे अनधिकृत उत्खनन केलेने सदर कंपनीस तहसीलदार, खेड यांनी रुपये ५,९५,००,०००/- इतक्या रक्कमेचा दि.२७/१२/२०११ रोजी दंडात्मक आदेश पारित केलेला होता.
(२) व (३) वर्ल्ड वाईड कंपनी (पूर्वीची इनरकोन) यांनी दंडाची रक्कम शासनजमा केली नसल्याने सदर कंपनीच्या पवनचक्क्या बंद करुन कंपनीचा नियंत्रण कक्ष सील करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाठार तर्फ वडगांव (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील उड्डाणपूल चौक परिसरात मूलभूत सुविधा पुरविण्याबाबत**

**(८) ८८७२९ (१८-०८-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाठार तर्फ वडगांव ( ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर ) येथील उड्डाणपूल चौक परिसरात अस्वच्छता, बेशिस्त वाहतूक, सुशोभिकरणाचा व दिशादर्शक फलकाचा अभाव, अनधिकृत डिजिटल होर्डिंग्ज, पावसाच्या पाण्याच्या निर्गतीचा प्रश्न अशा मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत रस्ते विकास महामंडळाच्या अधिका-यांना निवेदने देऊनही त्यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदरच्या मूलभूत सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) उड्डाणपूलाच्या सेवारस्त्याच्या लगत असलेली लहान मोठी दुकाने, हॉटेलधारक व फेरीवाले पूलालगत असलेल्या गटारामध्ये कचरा व टाकाऊ खादयपदार्थ टाकत असल्याने परिसरात अस्वच्छता होते, त्याची साफसफाई देखभाल दुरुस्ती कंत्राटदारामार्फत केली जाते.

उडडाणपूलाच्या उजव्या बाजूकडील वाहतूक बेट सुशोभित करण्यात आले आहे व डाव्या बाजूकडील वाहतूक बेट सुशोभित करण्याचे प्रस्तावित आहे.

या ठिकाणी वाहतूक नियमनासाठी माहिती फलक, सावधानतेचे फलक इ. बसविण्यात आले आहेत तसेच थर्मोप्लास्टिक पेंटिंग करण्यात आले आहे. सेवारस्त्यावर व मुख्य रस्त्यावर सतत राजकीय सन्माननीय सदस्य व इतरांचे वाढदिवस व अभिनंदनाचे होर्डींग्ज अनधिकृतपणे सर्रास लावले जातात ते वरचेवर काढून टाकण्यात येतात. पावसाच्या पाण्याच्या निर्गतीसाठी बिल्टअॅप ड्रेन बांधकाम करण्यात आले आहेत. ते नियमित साफ करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रामटेक विधानसभा क्षेत्रातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(९) ९८३३५ (२१-१२-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक विधानसभा क्षेत्रातील इतर जिल्हा मार्ग व प्रमुख जिल्हा मार्गावर मोठया प्रमाणात खड्डे पडल्याने दुचाकी व इतर मोठी वाहने यांचा अपघात होऊन प्रवासी जखमी होत असल्याचे व शेतक-यांना मोठा फेरा घेऊन शेतमालाची बाजारपेठेत तसेच इतरत्र वाहतूक करावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मनसर (ता.रामटेक, जि.नागपूर) येथे २०१३-१४ पासून टोल वसुली होत असून याचा स्थानिक नागरिकांना भुर्दंड बसत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार रामटेक विधानसभा क्षेत्रातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत तसेच मनसर येथील स्थानिक नागरिकांची टोल वसुली बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

रामटेक विधानसभा क्षेत्रातील विभागाच्या अधिनस्त असलेल्या राज्यमार्ग व प्रमुख जिल्हामार्गावर पावसाळयात काही ठिकाणी पडलेल्या खड्डयाची दुरूस्ती करण्यात आलेली असून रस्त्यावरील वाहतूक सुरळीत सुरू आहे.
(२) टोल वसुली राष्ट्रीय राज्यमार्ग प्रधिकरणाकडून राजपत्र नोटीफिकेशन नुसार होत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तहसील कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१०) १०६५३१ (२७-०३-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.रणजीत कांबळे (देवळी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) येथील तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी, लिपीक यांची अनेक पदे रिक्त असल्याने नागरिकांची कामे मोठ्या प्रमाणात प्रलंबीत असल्याचे तसेच या पदांची अनेक कामे तहसीलदारांना करावी लागत असल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार नांदगाव खंडेश्वर तहसील कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-१०-२०१८) :** (१), (२) व (३) नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथील तहसील कार्यालयातील काही रिक्त पदे प्रशासकीय बदल्याद्वारे भरण्यात आलेली आहेत. सद्य:स्थितीत नायब तहसीलदार-१, लिपीक-टंकलेखक-५, तलाठी-८ एवढी पदे रिक्त आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गंगाखेड व पालम (जि.परभणी) येथील तहसील व भूमिअभिलेख कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(११) १०७२७१ (२७-०३-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगाखेड व पालम (जि.परभणी) येथील तहसील कार्यालयातील अधिकारी, लिपीक, शिपाई तसेच भूमिअभिलेख कार्यालयातील उपनिरीक्षक, दप्तरबंद व शिपाई ही पदे रिक्त असल्याने शेतक-यांची भूमापनाची कामे मोठया प्रमाणावर प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कार्यालयातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-११-२०१८) :** (१) तहसिल कार्यालय, गंगाखेड येथे नायब तहसिलदार-१, लिपीक-१, शिपाई-२ पदे रिक्त आहेत. तहसिल कार्यालय,पालम येथे नायब तहसिलदार-१, लिपिक-२, शिपाई-१ पदे रिक्त आहेत.

उपअधीक्षक भूमि अभिलेख, गंगाखेड या पदी दि.१/११/२०१७ पासून नियमित अधिकारी कार्यरत आहे. उपअधीक्षक भूमि अभिलेख, गंगाखेड या कार्यालयातील दप्तरबंदाचे १ पद रिक्त आहे. उपअधीक्षक भूमि अभिलेख, पालम या पदाचा अतिरिक्त कार्यभार उपअधिक्षक भुमि अभिलेख, पूर्णा यांचेकडे आहे. उपअधीक्षक भूमि अभिलेख, पालम कार्यालयातील शिपाई संवर्गाचे १ पद रिक्त असून मुख्यालय सहायक व भूमापकाचे प्रत्येकी १ पद रिक्त आहे.

कार्यरत आस्थापनेद्वारे भूमापनाची कामे नियमित सुरु आहे. मार्च, २०१८ अखेर उपअधीक्षक भूमि अभिलेख, गंगाखेड कार्यालयात २० मोजणी प्रकरणे तर उपअधीक्षक भूमि अभिलेख, पालम कार्यालयात १ मोजणी प्रकरण प्रलंबित होती.

(२) सुधारीत आकृतीबंधास मान्यता प्राप्त करुन घेऊन रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सफाळे (पश्चिमेकडील) जलसार टेंभीखोडवे (जि.पालघर) या जोडरस्त्याचे काम भूसंपादनाअभावी अपूर्ण असल्याबाबत.**

**(१२) १०७५६३ (२७-०३-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सफाळे (पश्चिमेकडील) जलसार टेंभीखोडवे (जि.पालघर) या जोडरस्त्यासाठी भूसंपादन न झाल्याने रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे,
(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त जोडरस्त्यासाठीच्या भूसंपदनाची प्रक्रिया पूर्ण करुन तातडीने रस्त्याचे काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही
(३) प्रश्न उद्भवत नाही
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नाशिक-औरंगाबाद महामार्गावरील अनधिकृत ढाब्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१३) १०७६१८ (२७-०३-२०१८). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक-औरंगाबाद महामार्गावर दिडशेहून अधिक ढाबे अनधिकृतरित्या चालविले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार या अनधिकृत ढाब्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-११-२०१८) :** (१) नाशिक-औरंगाबाद महामार्ग हद्दीत अतिक्रमण झाले असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पंढरपूर येथील बंधाऱ्यास अवैध वाळू उपशामुळे निर्माण झालेला धोका

**(१४) ११०९८० (१८-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) शहरास सांगोला व शिरभावी योजनेत समाविष्ट असणाऱ्या ८१ गावांच्या पाणी पुरवठा करणेसाठी पंढरपूरातील अंबाबाई मंदिराजवळ बंधारा बांधण्यात आला असून त्या जवळ अवैध वाळू उपसा होत असल्याने सदर बंधाऱ्यास धोका निर्माण झाल्याचे दिनांक ०६ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्थानिक नगरपालिका प्रशासन यांनी संबंधित विभागाला वस्तुस्थिती सादर करून या अवैध वाळू उपशामुळे झालेल्या बंधाऱ्या लगत खड्डयांवर उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक असतांनाही जाणिवपुर्वक नगरपालिका प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी नगरपालिका प्रशासनाला तातडीने निर्देश देण्याची आवश्यकता असल्याने शासनाने या प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१८) :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयात भरडधान्य विकास कार्यक्रमाअंतर्गत मागणी अभावी स्प्रेपंपाची खरेदी केल्याबाबत**

**(१५) १११०६२ (०१-०४-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.रणजीत कांबळे (देवळी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०१४-१५ मध्ये राष्ट्रीय कृषी विकास योजना अंतर्गत भरडधान्य विकास कार्यक्रम या योजनेमध्ये अमरावती जिल्हयात मागणी नसतांना मनमानीपणे स्प्रेपंपाची खरेदी करुन शासनाचा निधीचा दुरुपयोग करण्याऱ्या तत्कालीन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांचेवर कारवाईबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती सन २०१४-१५ मध्ये राष्ट्रीय कृषी विकास योजनाअंतर्गत भरडधान्य विकास कार्यक्रम या योजनेमध्ये अमरावती जिल्हयात मागणी नसतांना मनमानीपणे स्प्रेपंपाची खरेदी करुन शासनाच्या निधीचा दुरुपयोग करण्याऱ्या तत्कालीन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-११-२०१८) :** (१) विभागीय कृषी सह संचालक, अमरावती यांना कळविले आहे.
(२) व (३) विभागीय कृषी सह संचालक, अमरावती यांनी या प्रकरणी चौकशी करुन सादर केलेल्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### चेंबुर (मुंबई) येथील अमर महल पुलाची उंची कमी करण्याबाबत

**(१६) १११५२४ (२७-०३-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वडाळा-घाटकोपर-ठाणे-कासारवडवली हा मेट्रोमार्ग अमर महल (चेंबुर) पुलावरुन जाणार असल्याने पुलाची उंची कमी करण्याच्या एमएमआरडीएच्या सुचनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने पुलाच्या कामाच्या वेळापत्रकासोबत एकुणच आराखड्यात बदल करावा अशी मागणी एमएमआरडीएने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमर महल पुलाच्या आराखड्यातील बदलाच्या कामासाठी व डागडूजीसाठी किती कोटीचा खर्च येणार आहे व हा वाढीव खर्च एमएमआरडीएकडून सार्वजनिक बांधकाम विभागास देण्यात येणार आहे काय,
(३) असल्यास, अमर महल पुलाच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे व सदर पूल किती कालावधीत वाहतूकीसाठी सुरु करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अमर महल पुलाच्या आराखडयातील बदलासाठी एकुण रु.१४.०१ कोटी खर्च येणार आहे.सदर वाढीव कामासाठीचा खर्च मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडुन सार्वजनिक बांधकाम विभागास देण्यात आला आहे.
(३) अमर महल उड्डाणपुलाच्या उत्तर वाहिनीचे (मुंबई ते ठाणे) काम पुर्ण झाले असून वाहतूक सुरु करण्यात आली आहे.उड्डाणपुलाच्या दक्षिण वाहीनीचे (ठाणे ते मुंबई) काम प्रगतीपथावर असून दि.२५.१०.२०१८ अखेर पर्यंत वाहतूक सुरु करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### जिल्हाधिकारी कार्यालय, ओल्ड कस्टम हाऊस, मुंबई येथील अधिकाऱ्यांनी जात प्रमाणपत्राचे अर्ज परस्पर निकाली काढल्याबाबत

**(१७) ११३३५८ (२३-०४-२०१८). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हाधिकारी कार्यालय, ओल्ड कस्टम हाऊस, मुंबई येथील उपजिल्हाधिकारी (कुलाबा डिविजन) पदी कार्यरत अधिकारी यांनी प्रवर्गातील उमेदवाराकडून जात प्रमाणपत्र पुष्ठयर्थ शासकीय जी.आर. प्रमाणे सर्व आवश्यक कागदपत्रे सादर केली असतानाही परीक्षण करतेवेळी या संदर्भातील शासन आदेशांचे अनुपालन न करता मनमानी करीत क्लिष्ट प्रश्नावली काढून त्याची ७ दिवसांत पूर्ती न केल्यास मोठ्या प्रमाणावर अर्ज परस्पर निकाली काढत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी प्रवर्गातील उमेदवारांची अडवणूक करणाऱ्या संबधीत जिल्हाधिकाऱ्याची विभागीय चौकशी करून बडतर्फ करण्याची मागणी मा. सामाजिक न्याय मंत्री, मा.पालक मंत्री, मुंबई शहर, मा.जिल्हाधिकारी, मुंबई यांना लेखी निवेदनाद्वारे विविध लोकप्रतिनिधी व स्थानिक नागरिकांनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-१०-२०१८) :** (१), (२) व (३) अशी बाब निदर्शनास आली नाही, जातीचे प्रमाणपत्र देणे बाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १.०९.२०१२ च्या अधिसूचनेनुसार कार्यवाही करण्यात येत आहे. जात प्रमाणपत्र देणेबाबतच्या प्रक्रियेत लोकांची अडवणूक होत असल्याबाबतची तक्रार लोकप्रतिनिधीकडून प्राप्त झाली आहे. सदर तक्रारीचे अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असता, जात प्रमाणपत्र देण्याबाबतच्या विहित कार्यपध्दती नुसार कार्यवाही केल्याचे दिसून आले. तसेच दिनांक १.०१.२०१७ ते १.०५.२०१८ या कालावधीत नामंजूर केलेल्या प्रकरणांचा आढावा घेतला असता सदरची प्रकरणे सक्षम प्राधिकारी यांनी अर्जदारांनी आवश्यक असणारी कागदपत्रे (मुख्यत्वे जातीचा पुरावा व मानीव दिनांकाचा पुरावा इत्यादी) विहित मुदतीत सादर न केल्यामुळे नामंजूर केली असल्याचे दृष्टोत्पत्तीस आले .

सक्षम प्राधिकारी यांचेकडे त्रुटी पूर्ततेवर प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेतला असता, सदरची प्रकरणे म्हणजे सक्षम प्राधिकारी यांनी अर्जदारांना त्रुटींची पूर्तता करणेकामी देखील पुरेपुर संधी दिल्याचे दिसते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदगाव (ता.नांदगाव, जि.नाशिक) येथे बनावट सातबाराद्वारे फसवणूक केल्याबाबत**

**(१८) ११४८२७ (२७-०३-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव (ता. नांदगाव,जि. नाशिक) येथील शर्त भंग होवून सरकार जमा झालेल्या शेत जमिनीचा बनावट सातबारा उतारा तयार करुन व सदर जमीन एका नागरिकाला विकून ५५

लाख रुपयांनी फसवणूक केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणातील आरोपीने याच प्रकारे अनेक नागरिकांची फसवणूक केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार या प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-१०-२०१८) :** (१), (२), (३) व (४) मौजे कासारी ता.नांदगांव येथील गट नं. ३०९ ही जमीन शर्तभंगाच्या कारणास्तव सरकारजमा झालेली आहे. सदर शेतजमीनीचा श्री.विष्णु केरुजी सानप या नावाने बनावट गा.न.नं.७/१२ उतारा तयार करुन दिनांक १६/९/२०१५ रोजी विक्री व्यवहार नोंदविण्यात आलेला आहे. याबाबत जमीन खरेदीदार श्री.निवृत्ती एकनाथ काकड यांनी फसवणुकीच्या अनुषंगाने दिनांक २/२/२०१८ रोजी श्री.विष्णु केरु सानप व लता विष्णु सानप यांच्याविरुध्द नांदगाव पोलीस स्टेशन येथे फिर्याद क्रमांक I १७/२०१८ दाखल करण्यात आली आहे. त्यानुसार पोलीस तपास सुरु आहे.

तसेच प्रकरणातील आरोपीने याच मिळकतीच्या अनुषंगाने इतर नागरीकांची फसवणुक केल्याचे सद्यस्थितीत आढळुन आलेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालवण (जि. सिंधुदूर्ग) तालुक्यातील तलाठी कार्यालये बंद असल्याबाबत

**(१९) ११६६८० (२०-०७-२०१८). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातबारा संगणकीकृत करण्यासाठी मालवण व कुडाळ तालुक्यातील तलाठ्यांना ओरोस (जि.सिंधुदूर्ग) या मुख्यालयाच्या ठिकाणी बोलावून रात्री उशिरा पर्यंत काम करून घेतले जात असल्याने माहे डिसेंबर, २०१७ पासून मालवण तालुक्यातील तलाठी कार्यालये बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलाठी कार्यालये बंद असल्यामुळे सर्वसामान्य ग्रामास्थाना आवश्यक असणारे विविध दाखले मिळण्यात अडचणी येत असून त्यामुळे त्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रशासनालाही विकास कामासाठी लागणारे तलाठी कार्यालयांचे दाखले मिळत नसल्याने विकास कामाचे प्रस्ताव रखडले असून पंचायत समितीच्या मासिक सभेतही सदस्यांनी याविषयी तक्रार करून कोणतीही उपाययोजना करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून मालवण तालुक्यातील तलाठी कार्यालये सुरु ठेवून नागरिकांना सातबारा तसेच इतर उतारे विहित वेळेत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-१०-२०१८) :** (१), (२), (३) व (४) गा.न.नं.७/१२ च्या संगणकीकरणाचे काम विहित मुदतीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने जिल्हा मुख्यालयी इंटरनेटचा स्पीड तुलनात्मक दृष्ट्या चांगला असल्याने मालवण व कुडाळ तालुक्यातील तलाठी आपल्या साजाचे कामकाज सांभाळून जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी येवून संगणकीकरणाचे काम करीत आहेत. मात्र सदर तलाठी आठवड्यातील २ दिवस पूर्ण वेळ साजाच्या ठिकाणी जाऊन नागरिकांना आवश्यक असलेले दाखले व कागदपत्रे पुरवित आहेत. त्यामुळे जनतेस किंवा प्रशासनाला गैरसोय होत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील वाळू टंचाईतून मार्ग काढण्याकरिता वाळू आयात करण्याचा निर्णय घेण्यात आल्याबाबत

**(२०) ११६८९७ (२०-०७-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वाळू टंचाईतून मार्ग काढण्याकरिता वाळू आयात करण्याचा निर्णय घेऊन याबाबतचे धोरणही लवकरच निश्चित होणार असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाळू कुठून व किती आयात केली जाणार आहे व त्यासाठी किती खर्च येणार आहे,
(३) असल्यास, याबाबत कधीपर्यंत निर्णय घेण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१८) :** (१), (२) व (३) वाळू आयात करण्यासंबंधीचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला नसून मुंबई परिसरातील मोठ्या प्रमाणावरील विकास कामे विचारात घेऊन परदेशातून वाळू आयात करण्याची संकल्पना शासनापुढे मांडण्यात आली आहे आणि सदर वाळूवर स्वामित्वधन आकारु नये, तसेच सदर वाळूच्या वाहतूकीसाठी वाहतूक पास उपलब्ध करुन देण्याची सूचना शासनास करण्यात आली आहे. त्यानुषंगाने आयात करण्यात येणाऱ्या वाळूच्या साठवणूक, विक्री व वाहतूकीसंबंधी महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियम), नियम,२०१३ मध्ये आवश्यक त्या तरतूदी करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**येळपणे (ता.श्रीगांदा, जि.अहमदनगर) येथील जमीन गैरव्यवहाराबाबत**

**(२१) ११७०५६ (२०-०७-२०१८). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येळपणे (ता.श्रीगांदा, जि.अहमदनगर) येथील गटक्रमांक ८८/३५ व ८८/३९ वर्ग २ या जमिनीची शासनाची परवानगी न घेता व दुय्यम निबंधक कार्यालयातील खरेदी विक्रीचा व्यवहार न पाहता तलाठ्यांनी पाच व्यक्तींच्या नावे हस्तांतर करुन ऑनलाईन सातबारा तयार करुन दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी तहसिलदार यांनी तलाठी यांच्याकडून खुलासा मागतिल्याचे दिनांक २३ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार या प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-१०-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) प्रस्तुत प्रकरणी दुय्यम निबंधक, श्रीगोंदा कार्यालयात मौजे येळपणे, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर येथील गट क्र.८८/३५ व ८८/३९, वर्ग-२ या जमिनींचे कोणतेही खरेदी-विक्रीचे व्यवहार झाल्याचे निदर्शनास आले नाही.

तथापि, तलाठी येळपणे सजा यांनी सदर गट नंबरच्या गा.न.नं.७/१२ उताऱ्यामध्ये कोणत्याही कायदेशीर कागदपत्रांशिवाय अनधिकृतपणे इतरांची नावे दाखल केल्याची बाब निदर्शनास आल्याने संबंधित तलाठी यांना निलंबीत करण्यात आले आहे.

तसेच उपरोक्त दोन्ही गटात दाखल झालेली नावे ही कोणत्याही कायदेशीर बाबीच्या आधारे झालेली नसल्याने या प्रकरणी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २५७ अंतर्गत उपविभागीय अधिकारी, श्रीगोंदा पारनेर यांनी पुनरीक्षण अंतर्गत कार्यवाही सुरु केलेली आहे.

---

**सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद येथील गैरव्यवहार**

**(२२) ११७८१९ (२०-०७-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद या विभागातील अभियंत्यांनी कोटयवधी रुपयांची कामे करुन केलेल्या गैरव्यवहार पकरणी ७ अभियंत्याना दोषी ठरविण्यात आले असून या संदर्भातील चौकशी अहवाल शासनाला अदयापी प्राप्त झाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणातील दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-११-२०१८) :** (१), (२) व (३) या प्रकरणी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांनी दि.५.६.२०१८ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला आहे. अहवालाची छाननी करण्यात येत आहे.

---

## सोलापूर जिल्हयातून जाणाऱ्या ५ महामार्गासाठी करण्यात येणाऱ्या भूसंपादनाच्या मूल्यांकन प्रक्रियेबाबत

**(२३) ११७८७२ (२०-०७-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातून जाणाऱ्या ५ महामार्गासाठी भूसंपादन करण्यात येणार असून शासनाने या भूसंपादनासाठी मूल्यांकनाची पक्रिया ग्रामीण व शहरी भागासाठी वेगवेगळी राबविण्याचा निर्णय दिनांक २१ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे शेतकऱ्यांचा जमिनी देण्यास विरोध असून उक्त निर्णय घेण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून ग्रामीण व शहरी भागासाठी एकाच मुल्यांकन पद्धती राबविण्याबाबत तसेच जमिनीचे भूसंपादन करुन महामार्गाचे काम तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

भूसंपादनासाठी मुल्यांकन करण्याची कार्यप्रणाली भूसंपादन अधिनियम, २०१३ मध्येच नमूद करण्यात आली आहे.
(२), (३) व (४) मुल्यांकन प्रक्रिया ही भूसंपादन अधिनियम, २०१३ मधील तरतूदीनुसार करण्यात येते. कायद्यामध्येच शहरी भागासाठी गुणांक १ नमूद असून शासनाने अधिसूचना दि.२६.०५.२०१५ व दि. २४.११.२०१७ नुसार प्रादेशिक क्षेत्रासाठी गुणांक १.५ व ग्रामिण भागासाठी गुणांक २ निश्चित करण्यात आला आहे.

सदर कार्यवाही कायद्याच्या तरतूदींशी सुसंगत अशीच करण्यात आली आहे.

---

**मौजे फेणे (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील इनाम वर्ग-३ च्या जमिनीबाबत**

**(२४) ११८०७६ (२०-०७-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे फेणे (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील इनाम वर्ग-३ च्या जमिनी शेतक-यांच्या विकासाकरिता शासन परिपत्रक दिनांक ३० जुलै, २०१० मधून वगळण्याबाबत मा.महसूल मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २२ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार या प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सन्माननिय सदस्यांच्या विनंतीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला असून सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

---

**मौजे ओवळी (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील जमीन गैरव्यवहाराबाबत**

**(२५) ११८०८० (२०-०७-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे ओवळी (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील सर्वे नं.१०/११, ६३/१५,७/३/२, ६/७, ६४/१४ या जमिनीचे मालक असलेल्या मारुती नाना पाटील व अनंता नाना पाटील यांनी बिल्डर शंकर एस.पवार याना अकृषिक परवानगी मिळणेकरिता कुलमुखत्यार आणि संमतीपत्र दिलेले नसतांना ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाने सर्वे नं. १०/११ व ६३/१५ या भूखंडाला अकृषिक परवानगी दिली असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार उक्त बिल्डर व त्यांस मदत करणा-या संबंधित अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-१०-२०१८) :** (१), (२), (३) व (४) श्री.गणेश म्हात्रे व इतर यांचे कुलमुखत्यार श्री.शंकर एस. पवार यांनी दिनांक २३/०१/२००८ व दिनांक २८/०१/२००८ रोजी सादर केलेल्या खातेधारकांच्या हमी पत्रकांच्या आधारे मौजे ओवळी, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील

स.नं. १/३६ व इतर या मिळकतीस जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या दिनांक ०७/०२/२००८ च्या आदेशान्वये औद्योगिक प्रयोजनार्थ बिनशेती परवानगी देण्यात आली आहे. सदर बिनशेती आदेशात प्रश्नात नमूद सर्वे नं. १०/११, ६३/१५, ७/३/२, ६/७, ६४/१४ या मिळकतींचादेखील समावेश आहे.

तथापि, सदर बिनशेती आदेशातील काही व्यक्ती संमतीपत्रके बनवायच्या काही वर्ष अगोदर मयत झाले असल्याची तक्रार श्री.रघुनाथ मारुती पाटील यांनी केली होती. सदर तक्रारीत तथ्य आढळून आल्याने जिल्हाधिकारी, ठाणे यांचे उक्त बिनशेती आदेश पुनर्विलोकनात घेण्यास विभागीय आयुक्त, कोकण यांनी दिनांक ३०/०६/२०१८ च्या पत्रान्वये मान्यता दिली आहे.

---

## पोहरा (जि.अमरावती) वनपरीक्षेत्रात अवैध रेती वाहतुकीच्या ट्रकची धडक लागून बिबट्याचा मृत्यू झाल्याबाबत

**(२६) ११८९८३ (२०-०७-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.रणजीत कांबळे (देवळी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा (जि.अमरावती) नदी पात्रातून मध्यरात्री होत असलेल्या अवैध रेती वाहतुकीमुळे पोहरा वनपरीक्षेत्रात रेतीच्या ट्रकची धडक लागल्याने बिबट्याचा मृत्यु झाल्याचे दिनांक १० मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बिबट्याच्या मृत्यु हा अवैध रेतीवाहतुक करण्याऱ्या ट्रकनेच झाला असल्याचा दावा वनविभागाने केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशी नुसार अवैध रेती वाहतुक करण्याऱ्या ट्रकचालक तसेच रेती माफियांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१८) :** (१), (२), (३) व (४) अमरावती वन विभागाच्या वडाळी परिक्षेत्रातील पोहरा या क्षेत्रात दि.८/५/२०१८ रोजी अमरावती-चांदूर रेल्वे मार्गावर अज्ञात वाहनाच्या धडकेने बिबट्याचा मृत्यू झाल्याचे आढळून आल्याने फ्रेजरपूरा पोलीस ठाणे, अमरावती येथे वन्यजीव (संरक्षण) अधिनियिम,१९७२ चे कलम ९,३९,५०,५१ अन्वये अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

तसेच शासनाच्या दि.३/१/२०१८ रोजीच्या वाळू/रेती निर्गती सुधारित धोरणानुसार वाळू/रेतीचे उत्खनन व वाहतूक सकाळी ६.०० ते सायंकाळी ६.०० या कालावधीच्या व्यतिरिक्त केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित वाळूघाट लिलावधारक व वाहनांवर पोलीस विभाग, प्रादेशिक परिवहन अधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांना कारवाई करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यात ट्रेझरद्वारे वाळू उत्खनन केले जात असल्याबाबत.**

**(२७) ११९९०५ (२०-०७-२०१८). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यात व एकंदरीत रत्नागिरी जिल्हयात अहोरात्र ट्रेझरद्वारे अवैध वाळू उत्खनन केले जात असून प्रांताधिकारी, खेड यांनी दिनांक २१ मे, २०११ रोजी सहा डंपरवर कारवाई करून ते ताब्यात घेतले असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या अवैध वाळू उपशामुळे शासनाच्या लाखो रुपयांच्या महसुलाचे नुकसान होत असून अनेक प्रकरणी प्रांताधिकारी, तहसिलदार, मंडळ अधिकारी, तलाठी यांच्या कार्यालयासमोरून वाळूची वाहतूक होत असताना संबंधित अधिकाऱ्याकडून कोणतीही कारवाई केल्या जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार खेड तालुक्यात व एकंदरीत रत्नागिरी जिल्हयात अवैध वाळू उपसा करून वाहतूक करणाऱ्या वाळू माफियांवर तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१८)** : (१) उपविभागीय अधिकारी, खेड (जि.रत्नागिरी) यांनी दि.२१ मे,२०१८ रोजी वाळू वाहतूक करणारे सहा डंपर तपासणीसाठी ताब्यात घेतले असता, सदर डंपर वाहन चालकांकडे वाळू वाहतूकीबाबतचे रितसर पास असल्याचे आढळून आल्याने तसेच संबंधित परवानाधारकांनी स्वामीत्वधनाची रक्कम भरली असल्याबाबतची खात्री झाल्याने सदरची वाहने सोडण्यात आली आहेत.

(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्हयातील भूमी अभिलेख विभागाला ईटीएस उपकरणांचा पुरवठा करण्याबाबत**

**(२८) १२०६१८ (२०-०७-२०१८). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील भूमी अभिलेख विभागात जमीन (शेती) मोजणी करणाऱ्या ईटीएस उपकरणांचा तुटवडा तसेच कर्मचाऱ्यांची अपूरी संख्या असल्यामुळे सुमारे ११०० जमीन मोजणी प्रकरणांची कामे प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करून ईटीएस उपकरणांचा पुरवठा तसेच कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरून शासनाच्या महसूलाचे होणारे नुकसान रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-११-२०१८) :** (१) अकोला जिल्हयातील अधिनस्त उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालयाकडे एप्रिल, २०१८ मध्ये एकूण १११६ मोजणी प्रकरणे प्रलंबित होती. त्यापैकी ९२९ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. उर्वरीत प्रकरणे निकाली काढण्याची नियमानुसार कार्यवाही चालू आहे. तसेच अकोला जिल्ह्यांमध्ये एकूण १७ ईटीएस मशीन व २४ फलक यंत्र उपलब्ध आहेत. तसेच एकूण २४ भूकरमापकांची पदे मंजूर असून त्यापैकी २१ भूकरमापक कार्यरत आहेत.
(२) भूमि अभिलेख विभागास नवीन ईटीएस मशीन खरेदी करणेसाठी शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत वित्त विभागास प्रकरण सादर करण्यात आले आहे. सदर निधी प्राप्त झाल्यानंतर त्यानिधीमधून GEM पोर्टलव्दारे ईटीएस मशीन खरेदी करण्याचे नियोजित आहे. तसेच भूमि अभिलेख विभागातील गट क संवर्गातील १००% रिक्त पदे भरण्याबाबत दि. ०९.०७.२०१८ रोजीच्या पत्रान्वये जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून प्राप्त झालेला प्रस्ताव वित्त विभागास मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ऐरोली व मुंलुंड येथील टोल वसुली बंद करण्याबाबत

**(२९) १२०६४२ (२०-०७-२०१८). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंब्रा (जि.ठाणे) बाहयवळण रस्त्याच्या नुतनीकरणाच्या कामामुळे रस्त्यावरील वाहतूक ऐरोली व शिळफाटामार्गे वळविण्यात आली असल्यामुळे ऐरोली व आनंदनगर (मुलुंड) येथील टोलनाक्यावर वाहनांच्या रांगा लागून वाहतूक कोंडी होत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंब्रा बाहयवळण रस्त्याच्या कामामुळे ऐरोली-मुंलुंड-शिळफाटा मार्गे वळविण्यात आलेल्या वाहतुकीमुळे वाहतूक कोडीं होवू नये याकरिता मुंब्रा-बायपासचे काम पूर्ण होईपर्यंत ऐरोली आणि आनंदनगर (मुलुंड)येथील टोलनाक्यावरील टोल वसुली थांबविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन ऐरोली-शिळफाटा मार्गावरील वाहतूक कोंडी दूर करण्याकरिता ऐरोली व मुंलुंड येथील टोल वसुली बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मुंब्रा बायपास वरील पुल दुरुस्तीच्या कामामुळे ऐरोली-शिळफाटा मार्गावर होणारी वाहतूक कोंडी विचारात घेऊन शासनाच्या दि. ०५ जुलै, २०१८ रोजीच्या पत्रान्वये सदर पूल दुरुस्तीचे काम होईपर्यंत ऐरोली व मुलूंड पथकर नाक्यापैकी एका पथकर नाक्यावर पथकर आकारुन दुस-या पथकर नाक्यावरुन वाहन पथकर न घेता सोडण्यात यावे असे निर्देश देण्यात आलेले होते. सद्य:स्थितीत रस्ता पुर्ववत सुरु झालेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वसूसायगांव (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) येथील विहिरीतून गारगोटीची तस्करी झाल्याबाबत**

**(३०) १२०७३८ (२०-०७-२०१८). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसूसायगांव (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) येथील विहिरीतून गेल्या पाच वर्षात ७० ते ८० लाख रुपयांच्या रंगीबेरंगी गारगोटी तस्करी झाल्याने संबंधित तलाठ्यास पाहणी करुन पंचनामा करण्याचे आदेश तहसीलदार, गंगापूर यांनी दिल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार यासंदर्भात पाहणी अथवा चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय व त्यानुसार उक्त विहिरीतून गारगोटीची तस्करी करणाऱ्या संबंधित दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१८) :** (१), (२) व (३) दि. २३/०४/२०१८ रोजी एका वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने तहसीलदार, गंगापूर यांनी संबंधीत मंडळ अधिकारी, डोणगांव व तलाठी, डोणगांव यांचेसमवेत प्रत्यक्ष जायमोक्यावर जावून पंचनामा केला आहे. मौजे वसूसायगांव, ता.गंगापूर येथे गट नं.११ मधील विहिरीतून निघालेल्या गौणखनिजाची पाहणी केली असता सदर गौणखनिज हे माती व दगड स्वरुपाचे असून रंगीबेरंगी गारगोटी नसल्याचे आढळून आले आहे. तसेच स्थानिक चौकशीतून याठिकाणी कोणत्याही स्वरुपाचे गौणखनिज वाहतूक व विक्री झाली नसल्याचे आढळून आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगाव जिल्हयातील शालेय विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र वेळेवर मिळत नसल्याबाबत**

**(३१) १२०७६२ (२६-०७-२०१८). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयातील शालेय विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र वेळेवर मिळत नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित प्रकरणातील त्रुटी पूर्ण करण्याकरीता कार्यालयात चार-चार महिने फेऱ्या मारूनही प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांनी अधिकाऱ्यांकडे माहिती विचारली असता त्यांच्याकडून माहिती देण्यात टाळा-टाळ करण्यात येऊन संबंधित अधिकारी बेजबाबदार उत्तरे विद्यार्थ्यांना देत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र त्वरीत मिळण्याबाबत तसेच टाळाटाळ करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-१०-२०१८) :** (१), (२) व (३) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(४) जळगांव जिल्हयात सर्व उपविभागीय अधिकारी यांचे अधिनस्त तालूक्यातील सेतू सुविधा केंद्रे तसेच महा ई- सेवा केंद्रे या यंत्रणेमार्फत प्राप्त परिपूर्ण प्रस्ताव असल्यास जात प्रमाणपत्र तातडीने वितरित करण्यात येतात. तसेच प्रस्तावात कांही त्रुटी आढळून आल्यास त्याची पूर्तता संबंधित अर्जदार यांचेकडून करुन घेऊन जात प्रमाणपत्र देण्यात येतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### रेती उत्खननाचे परवाने न दिल्याने रेती अभावी अनेक बांधकामे रखडली असल्याबाबत

**(३२) १२१०१५ (२०-०७-२०१८). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने रेती उत्खननाचे परवाने न दिल्याने रेती अभावी अनेक बांधकामे रखडली असल्यामुळे शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील वीट भट्टीच्या शेकडो कारखान्यांना याचा फटका बसून त्यांची आर्थिक स्थिती बिकट झाली आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास,चौकशीनुसार बांधकामे पूर्ववत सुरु ठेवण्यासाठी रेती उत्खननाला परवानगी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच किती कालावधीत परवानगी मिळणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१८) :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२) व (३) सन २०१८-१९ या वर्षासाठी ठाणे जिल्ह्यातील नदीपात्रातील वाळूगटांचे जिल्हा खनिकर्म अधिकारी, वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा तसेच संबंधीत तहसीलदार यांचेमार्फत संयुक्त सर्वेक्षण करण्यात आले असून शहापूर तालुक्यातील मौजे काथोळे येथील चोर नदी व मौजे खरपत येथील शाई नदी पात्र असे दोन वाळूगट वाळू उत्खननासाठी योग्य ठरविण्यात आले असून सदर वाळूगटांना खाणकाम आराखडा तयार करण्याची व पर्यावरण अनुमती प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच खाडीपात्रातील वाळूगटांचे सर्वेक्षण करुन वाळूगटातील उपलब्ध वाळूसाठा व उत्खननाची कार्यपध्दती निश्चित करणेबाबत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डास कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालेगाव (जि.नाशिक) येथे बेकायदा वाळू वाहतुकीची जप्त करण्यात आलेली वाहने पळविल्याबाबत**

**(३३) १२१२६५ (२०-०७-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव (जि.नाशिक) येथे बेकायदा वाळू वाहतुकीचे जप्त करण्यात आलेले १० ट्रक व ट्रॅक्टरसह वाळूने भरलेल्या दोन ट्रॉली वाळू माफीयांनी तहसिल कार्यालयातून तहसिलदारासमक्ष पळवून नेल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संवदगाव शिवारात वाळू चोरांवर कारवाई करण्याची सुचना तहसिलदारांनी तलाठी यांना करुनही त्यांनी कारवाई करुन गुन्हे नोंदविण्यास टाळाटाळ केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार या प्रकरणातील संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१८) :** (१), (२), (३) व (४) मालेगाव (जि.नाशिक) तहसील आवारात जप्त असलेले १० ट्रक दि.१९/०३/२०१८ रोजी रात्री पळवून नेल्याची बाब दि.२०/०३/२०१८ रोजी निदर्शनास आली. त्यानुषंगाने तहसीलदार, मालेगाव यांनी संबंधितांविरुध्द छावणी पोलीस ठाणे, मालेगाव येथे दि.२०/३/२०१८ रोजी गु.र.नं.३३/२०१८ गुन्हा नोंद केला. छावणी पोलीस ठाणे यांनी तपास करुन सदर गुन्ह्यातील १० वाहने जप्त केली आहेत.

तसेच तहसीलदार, मालेगाव व इतर तलाठी यांचे पथकास दि.२५/४/२०१८ रोजी सवंदगाव शिवारातील गिरणा नदीपात्रात अवैध वाळू वाहतूक करणारे ट्रॅक्टर पळवून नेल्याची बाब निदर्शनास आली आहे. सदर प्रकरणी मंडळ अधिकारी, कौळाणे यांनी संबंधितांविरुध्द पवारवाडी पोलीस ठाणे, मालेगाव येथे गुन्हा नोंद केला आहे.

तलाठी, सवंदगाव यांनी वाळू चोरांवर कारवाई करुन गुन्हे नोंद करण्यास टाळाटाळ केल्याप्रकरणी उपविभागीय अधिकारी, मालेगांव यांनी त्यांच्या दि.२६/४/२०१८ रोजीच्या आदेशान्वये तलाठी, सवंदगांव यांना निलंबित केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे गौरीपाडा व नारपोली (ता. भिवंडी,जि.ठाणे) येथील दर्गाह दिवाण शहा ट्रस्टच्या जमिनीच्या सातबारामध्ये बेकायदेशीररित्या नावे लावल्याबाबत**

**(३४) १२१२८१ (२०-०७-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
**(१)** मौजे गौरीपाडा व नारपोली (ता. भिवंडी,जि.ठाणे) येथील दर्गाह दिवाण शहा ट्रस्ट च्या नावे असलेल्या जमिनीच्या सातबारामध्ये बेकायदेशीर नावे लावण्यात आल्याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधी (भिवंडी) यांनी मा. महसूल मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या व सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) मौजे गौरीपाडा, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील स.नं. २२/६, २३/६, २४/५, ५७/२ व ५७/३ या जमिनी पिर हजरत दिवाण शहा दर्गा ट्रस्ट द्वारा चिफ ट्रस्टी यांनी दिनांक ०९/०२/१९८७ च्या दहा वर्षाच्या नोंदणीकृत भाडेपट्याने दिल्या होत्या. त्याबाबतची नोंद गावदप्तरी फेरफार क्रमांक १०९५ अन्वये घेण्यात आली होती. सदर भाडेपट्टा सन १९९७ मध्ये संपुष्टात आल्याने भाडेपट्याबाबत गावदप्तरी घेण्यात आलेला फेरफार क्रमांक १०९५ हा रद्द करण्यात आल्याची नोंद फेरफार क्रमांक १८६९, दिनांक २७/०६/२०१८ अन्वये घेण्यात आली असून भाडेपट्टा धारकांची नावे अधिकार अभिलेखातून कमी करण्यात आली आहेत.

---

**वाशिम जिल्हयातील शेतक-यांवर समृध्दी महामार्गासाठी जमिन देण्याबाबत शासकीय अधिकाऱ्यांकडून दबाव टाकण्यात येत असल्याबाबत.**

**(३५) १२१५८६ (२०-०७-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा**

**गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयातील शेतक-यांवर समृध्दी महामार्गासाठी जमिनी देण्यासाठी शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचेकडून दबाव टाकण्यात येत असल्याचे दिनांक १५ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाशिम जिल्हयातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी समृद्धी महामार्गासाठी संपादित केल्या असल्या तरी बहुतांश शेतक-यांना अद्यापही जमिनीचा योग्य मोबदला मिळाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून जमिनी देण्यासाठी शेतकऱ्यांवर दबाव टाकणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करून शेतकऱ्यांना जमिनीचा योग्य मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) महाराष्ट्र समृध्दी महामार्गाकरीता खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने खरेदी करण्यात आलेल्या खाजगी जमिनींचा मोबदला संबंधित जमीन मालकांच्या बँक खात्यामध्ये RTGS पध्दतीव्दारे तात्काळ जमा करण्यात आला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रावेर (जि.जळगाव) मतदारसंघातील महत्वाचे इतर जिल्हा मार्ग हे प्रमुख जिल्हा मार्ग म्हणून दर्जोन्नत करण्याबाबत

**(३६) १२१६९७ (३०-०७-२०१८). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर जि.जळगाव मतदारसंघातील इजिमा रस्ते प्रजिमा म्हणून दर्जोन्नत करणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावानुसार रस्ते दर्जोन्नत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-१०-२०१८) :** (१) होय.

(२) याबाबतचे दर्जोन्नती करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील रा.मा.क्र. १७८ ते करूळ-नावळे-सडुरे कुर्ली-घोनसरी-फोंडामार्ग या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(३७) १२२१६० (२०-०७-२०१८). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील रा.मा.क्र. १७८ ते करूळ-नावळे-सडुरे कुर्ली-घोनसरी - फोंडामार्ग रस्ता प्र.जी.मा.क्र. ६ या रस्त्याची दुरवस्था झाली असून रस्त्याच्या दुरुस्तीकडे संबंधितांकडून दुर्लक्ष होत असल्यामुळे रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्याच्या देखभाल व दुरुस्तीसाठी शासनाने सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात १७ कोटी २ लाख इतक्या रकमेची तरतूद केली असूनही अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्नाधीन रस्त्याच्या देखभाल व दुरुस्ती करण्याच्या कामास रु. १ कोटी ७२ लक्ष इतक्या रक्कमेस दिनांक २.३.२०१७ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

सदर कामाकरिता दोन वेळा निविदा बोलाविण्यात आल्या होत्या परंतू ठेकेदारांकडून प्रतिसाद मिळाला नाही. माहे एप्रिल २०१८ मध्ये सदर कामाकरिता ठेकेदाराची जादा दराची निविदा प्राप्त झाली असून, देकार कमी करण्याकरीता ठेकेदाराशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. निविदा निश्चितीनंतर कार्यारंभ आदेश देऊन कामास सुरुवात करण्यात येईल.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक रोड येथील सेतु कार्यालय सुरु करण्याबाबत**

**(३८) १२२४९० (२०-०७-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक रोड येथील सेतु कार्यालय गत तीन महिन्यापासून बंद असल्याने महिला, विद्यार्थी व नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे महिला व विदयार्थी यांना विविध दाखल्यांकरीता महा ई सेतु, आपलं सरकार आणि सायबर कॅफेमधुन मिळणा-या प्रमाणपत्रांसाठी मोठया प्रमाणात आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून नाशिक येथील सेतू कार्यालय सुरु करण्याबाबत तसेच विविध दाखले नागरिकांना सुलभरित्या मिळण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-१०-२०१८) :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही,
(३) नाशिक शहर व नाशिक ग्रामीण येथील सेतू केंद्रांकडून मोठया प्रमाणात अनियमितता आणि अटी व शर्तीचा भंग केला गेल्याने सदरील सेतू केंद्र दिनांक ५.०३.२०१८ च्या आदेशान्वये बंद करण्यात आले होते. त्यादम्यान नागरिकांना सहज व वेळेत दाखले उपलब्ध व्हावेत याकरिता महा ई-सेवा केंद्र, ग्रामपंचायत स्तरावरील आपले सरकार सेवा केंद्र, खाजगी व्हीएलई मार्फत चालविले जाणारे "आपले सरकार सेवा केंद्र" व "आपले सरकार पोर्टल" याव्दारे नागरिकांना ऑनलाईन दाखले प्राप्त करुन घेण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. यापूर्वी नाशिक शहरात ८३ आपले सरकार सेवा केंद्रे सुरु करण्यात आली आहेत.

नाशिक शहर व नाशिक तालुका ग्रामीण येथील सेतू केंद्रे दि. २६.०७.२०१८ पासून सुरु करण्यास आदेशित करण्यात आले आहे. त्यामुळे नाशिक जिल्हयात नागरिकांना विविध दाखले मिळण्याच्या सेवा उपलब्ध आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयात गौण खनिज उत्खननाच्या परवान्यासाठी जाणीवपूर्वक विलंब लावला जात असल्याबाबत

**(३९) १२३०१५ (२०-०७-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
**(१)** कोल्हापूर जिल्हयात दगड, खडी, माती, मुरुम या गौण खनिजांच्या उत्खननासाठी परवाना देण्यास पंधरा दिवसांची मुदत दिली असतानाही परवाना देण्यासाठी जाणीवपूर्वक विलंब लावला जात असल्याचे माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अवैध गौण खनिज उत्खननासाठी आकारण्यात येणाऱ्या दंडास गौण खनिज कृती समितीच्या वतीने विरोध करून जिल्हाधिकारी कार्यालयावर त्याबाबत मोर्चा काढला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून गौण खनिज उत्खननाचे परवाने वेळेत देण्याबाबत तसेच अवैध गौण खनिज उत्खननाच्या दंडाच्या रक्कमेत कपात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१८) :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२) दि.१२/१/२०१८ रोजीच्या अधिसूचनेनुसार महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजाचे उत्खनन व ती काढणे) (सुधारणा) नियम,२०१७ अन्वये मूळ नियमात समाविष्ट नियम ९ प्रमाणे गौण खनिजाच्या अवैध उत्खननाबाबत/वाहतूकीबाबत करण्यात येणाऱ्या शास्तीच्या कारवाईच्या अनुषंगाने कोल्हापूर जिल्हा गौण खनिज व मशीनरी व्यवसाय बचाव कृति समिती, जयसिंगपूर यांनी जिल्हाधिकारी, कोल्हापूर कार्यालयावर मोर्चाद्वारे निवेदन दिले आहे.
(३) गौण खनिज उत्खननाचे परवाने विहित वेळेत निर्गमित करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना सूचना जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे स्तरावरुन देण्यात आलेल्या आहेत.

दि.१२/१/२०१८ रोजीची अधिसूचना प्रसिध्द करण्यापुर्वी नागरिकांकडून हरकती मागविण्यात आल्या होत्या. तथापि, कोणत्याही प्रकारच्या हरकती प्राप्त न झाल्याने दि.१२/१/२०१८ रोजीच्या अधिसूचनेन्वये गौण खनिजाच्या अवैध उत्खननाबाबत दंडाची रक्कम निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे गौण खनिजाच्या अवैध उत्खननाच्या/वाहतूकीच्या अनुषंगाने उक्त नियम-९ अन्वये आकारण्यात येणाऱ्या दंडाच्या रक्कमेत कपात करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्ह्यातील महसूल विभागातील उपजिल्हाधिका-यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४०) १२३५१६ (२०-०७-२०१८). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील महसूल विभागातील उपजिल्हाधिका-यांची ६ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या रिक्त पदांमुळे कामकाजात मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरची पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत व सदर पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-१०-२०१८) :** (१), (२) व (३) परभणी जिल्ह्यात उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची दोन पदे रिक्त होती. दि. २३.०८.२०१८ च्या शासन आदेशान्वये सदर रिक्त पदे भरण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे येलकी (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथे बनावट टिपी पावत्याच्या आधारे वाळूची तस्करी होत असल्याबाबत**

**(४१) १२४२९७ (२०-०७-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे येलकी (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथे दिंनाक ३० डिसेंबर, २०१७ रोजी जिल्हा खनिकर्म अधिकारी व तहसिलदार यांनी कळमनुरी येथील विजयराव पतंगे यांच्या घरासमोर असलेला रेतीसाठा जप्त केला असता धांवडा रेती घाटाच्या एक खरी व चार बनावट टिपी पावत्या अधिकाऱ्यांना दाखविल्याचे दिनांक ७ जून, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरात अधिकाऱ्यांच्या संगनमताने बनावट टिपी पावत्याच्या आधारे मोठया प्रमाणात वाळूची तस्करी सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार संबधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-१०-२०१८) :** (१), (२), (३) व (४) दि.३०/१२/२०१७ रोजी जिल्हा खनिकर्म अधिकारी, हिंगोली व तहसीलदार यांनी त्यांच्या पथकासह रोजी मौजे येलकी, ता.कळमनुरी, जि.हिंगोली येथे भेट दिली असता, श्री.विजयराव पतंगे यांच्या घरासमोर ०५ ब्रास वाळूसाठा आढळून आल्याने सदर वाळू साठ्याच्या वाहतूक पासाबाबत संबंधितांना विचारणा केली असता ०५ वाहतूक पास सादर केल्या. सदर ०५ वाहतूक पासची तपासणी केली असता त्यापैकी ०४ वाहतूक पास बनावट असल्याचे आढळून आल्याने संबंधितांविरुध्द दि.३०/५/२०१८ रोजी पोलीस ठाणे, बाळापूर येथे गु.र.नं.१५६/२०१८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच मौजे येलकी येथे ०५ ब्रास वाळूसाठा व त्याच परिसरात इतर ठिकाणाहून १८ ब्रास असा एकूण २३ ब्रास वाळूसाठा जप्त करण्यात आला असून त्याचा नियमानुसार लिलाव करुन लिलावाद्वारे प्राप्त रु.४८,०००/- इतकी रक्कम शासनजमा करण्यात आली आहे.

सदर ठिकाणी अधिकाऱ्यांच्या संगनमताने बनावट वाहतूक पासच्या आधारे वाळूची तस्करी होत असल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनधिकृत गौण खनिज उत्खननाच्या दंडाच्या रकमेत वाढ केल्याबाबत**

**(४२) १२४६८० (२०-०७-२०१८). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनधिकृत गौण खनिज उत्खनन व वाहतुकीच्या दंड रकमेत शासनाने दुपटीने वाढ केली असून मालवण (जि.सिंधुदूर्ग) येथील तहसीलदारांनी नव्याने निश्चीत केलेल्या दंडाच्या रकमेप्रमाणे दंड आकारणार असल्याचे जाहिर केल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मालवण तालुक्यात तसेच राज्यातील अनेक ठिकाणी वाळू उपशाची मुदत संपुनही वाळू उपसा करून वाहतूक केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून सदरचा नियमबाहय वाळू उपसा रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-१०-२०१८) :** (१) राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्या दि.१२/१/२०१८ रोजीच्या अधिसूचनेन्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ मधील कलम ४८ मधील पोट कलम (८) खालील शास्ती व वैयक्तीक जातमुचलकाबाबत केलेल्या वाहने/साधनांनिहाय शास्तीच्या सुधारणेनुसार नव्याने निश्चित केलेल्या दंडाच्या रक्कमेप्रमाणे दंड आकारण्याचे जाहीर करण्यात आले आहे.
(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भाटगाव (ता.चांदवड, जि.नाशिक) येथील वहिवाट रस्त्यातील अडथळे दूर करण्याबाबत**

**(४३) १२४९८१ (२०-०७-२०१८). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भाटगाव (ता.चांदवड, जि.नाशिक) येथील पूर्वीच्या वहिवाट रस्त्यातील अडथळे दूर करून तो खुला करावा या मागणीसाठी येथील मोरे कुटुंबीयांनी तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू केल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रस्त्यात अडथळे असल्याने शेतमालाची ने-आण करताना गैरसोय होत असल्याचे या कुटुंबीयांनी प्रतिपादन केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून वहिवाट रस्त्यातील अडथळे दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-१०-२०१८) :** (१) व (२) भाटगांव (ता.चांदवड जि.नाशिक) येथील वहिवाट रस्त्यातील अडथळा दुर होवुन रस्ता पुर्ववत होत नाही तोपर्यत तहसिल कार्यालयासमोर दिनांक ११/५/२०१८ पासून आमरण उपोषणास बसणेबाबतचे निवेदन श्री.निवृत्ती मोरे व इतर यांनी दिनांक ३/५/२०१८ रोजी तहसिलदार, चांदवड यांना दिले होते.

(३) त्यानुषंगाने सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी, चांदवड यांच्याकडे सुरु असलेल्या रिव्हीजन केस नं.१३५/२०१७ मध्ये दिनांक १०/५/२०१८ रोजी आदेश पारित करण्यात येवुन तहसिलदार,चांदवड यांनी वहिवाट केस नं.२३/२०१७ मध्ये फेरचौकशी करुन अंतिम आदेश पारित करण्याबाबत आदेशित करण्यात आले. त्यानुसार तहसिलदार,चांदवड यांनी मामलेदार न्यायालय अधिनियम, १९०६ नुसार दिनांक १९/५/२०१८ रोजी आदेश पारित केले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील राजुरा-बल्लारपूर मार्गावरील रेल्वेपूलाचे प्रलंबित बांधकाम सुरु करण्याबाबत**

**(४४) १२५०४६ (२०-०७-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील राजुरा-बल्लारपूर मार्गावरील रेल्वेपूलाचे प्रलंबित बांधकाम सुरु करण्याकरिता मा.वित्त्तमंत्री यांनी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याचे निर्देश वित्त्त विभागाला माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्देशानुसार चंद्रपूर जिल्हयातील राजुरा-बल्लारपूर मार्गावरील रेल्वेपूलाचे प्रलंबित बांधकाम सुरु करण्यासाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.
वित्त विभाग विभागाच्या उपलब्ध अभिलेखावरुन तपासणी केली असता मा. वित्तमंत्री यांनी अशा प्रकारे निधी उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिल्याचे आढळुन येत नाही.
(२) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्र.- सुप्रमा - २०१५/प्र.क्र.५५/ रस्ते-५, दिनांक १८ जून,२०१८ अन्वये प्रलंबित बांधकामास रु.२४,७१,८२,१३४ / - रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.सदर काम मार्च, २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**पांढरकवडा (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील जमीन गैरव्यवहाराबाबत**

**(४५) १२५११२ (२०-०७-२०१८). श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पांढरकवडा (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील जुन्या गावठाण हद्दीतील नझुल शहर सी.क्र.९ - बी मधील प्लॉट क्र.१९७ सत्ता प्रकार “डी” एकूण क्षेत्रफळ ३३६६ चौ.फू. या सन १९३२ पासून शासनाने आरक्षित ठेवलेल्या सरकारी मालकी हक्काच्या भूखंडाची चौकशी करून शासन स्तरावर अहवाल पाठविण्यात यावा अशा मागणीचे एक निवेदन विनोद दामोदर

सिंघानिया यांनी जिल्हाधिकारी, यवतमाळ, मुख्य सचिव महाराष्ट्र शासन, प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मा.महसूल मंत्री, मा.मुख्यमंत्री आदींकडे माहे मार्च, २०१६ पासून आतापर्यंत सातत्याने सादर केले असून लोकप्रतिनिधी श्री.अनिल गोटे यांनी या प्रकरणी दिनांक ४ मार्च, २०१६ रोजी तत्कालिन महसूल मंत्र्याकडे सादर केलेल्या निवेदनावर महसूल मंञ्यांनी चौकशी करून अहवाल देण्याचे आदेश प्रधान सचिव, महसूल विभाग यांना दिलेले होते, हे खरे आहे काय,

(२) तसेच अतिरिक्त आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांनी अपिल क्र.३१९/एलएनए २२/पांढरकवडा/२०१५-१६ या प्रकरणामध्ये दिनांक ४ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या स्थगितीचे आदेश रद्द करून कोटयवधी किंमतीचे सरकारी मालकी हक्काचे भूखंड तात्काळ ताब्यात घेवून दोषी प्रशासकीय अधिकारी व भूमाफीया यांच्यावर भादंवी कलम १२०(ब), ४६८, ४७१, ४७७, ४२० व भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याचे कलम १३(२), १३(१) या अन्वये फौजदारी कारवाई करण्याबाबत निवेदन श्री.अशोक एस.शेटे व विनोद दामोदर सिंघानिया यांनी विभागीय आयुक्त अमरावती यांचेकडे दि.२५ नोव्हेंबर २०१६ रोजी व त्यापूर्वी दि.१६ ऑगस्ट २०१६ रोजी सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार या दोन्ही प्रकरणी दोषी असणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-१०-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) सदरहू प्रकरणी लोकप्रतिनिधी यांनी दि. ०४/०३/२०१६ रोजी तत्कालीन मा. मंत्री (महसूल) यांना तर अध्यक्ष, अखिल भारतीय शोषण विरोधी मोर्चा, पिंपळगांव, जि. यवतमाळ यांनी दि. १२/०८/२०१६ रोजी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे कार्यालयाकडे निवेदन दिले होते.

तत्कालीन मा. मंत्री (महसूल) यांना दि. ०४/०३/२०१६ रोजी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने उप विभागीय अधिकारी, केळापूर यांनी सदर प्रकरण अर्ध न्यायीक स्वरुपात नोंदवून दि. ०४/०६/२०१६ रोजी विषयांकित जमीन शासन जमा करण्यात आल्याचे आदेश पारित केले आहेत. तथापि, सदर आदेशाविरुध्द प्रतिवादी यांनी विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचेकडे अपील दाखल केले होते.

उक्त अपिलाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांनी दि. ०३/०६/२०१७ रोजी आदेश पारित केले असून शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दि. २३/१२/२०१५ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याबाबत उप विभागीय अधिकारी, पांढरकवडा (केळापूर) यांना निर्देशित केले आहे. तथापि, जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी त्यांच्या दि. २५/०७/२०१८ च्या पत्रान्वये उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदी सदर प्रकरणात लागू होत नाहीत. त्यामुळे उक्त आदेशाची अंमलबजावणी करणे कठीण होत असल्याने सदर आदेशाचे पुनर्विलोकन करून आदेशीत करण्याबाबत विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना विनंती केली आहे.

---

**सोलापूर जिल्हयात महाविद्यालयीन प्रवेशासाठी लागणारे विविध दाखले तातडीने मिळण्याकरिता सक्षम व्यवस्था कार्यान्वीत करण्याबाबत**

**(४६) १२५६०८ (२०-०७-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात १० वी व १२ वीच्या निकालानंतर महाविद्यालयीन प्रवेशासाठी लागणारे विविध दाखले मिळविण्यासाठी हजारो विद्यार्थी व पालक सेतू कार्यालयात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे विविध महसूली दाखले तातडीने मिळण्यासाठी सक्षम व्यवस्था जिल्हा प्रशासनाने कार्यान्वीत करण्याच्या मागणीसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी यांना दिनांक १४ जून, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने १० व १२ वी च्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी लागणारे आवश्यक दाखले तातडीने वितरित करण्यासाठी सक्षम व्यवस्था कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-१०-२०१८) :** (१), (२) व (३) होय.

सोलापूर जिल्हयात इयत्ता १० वी व १२ वी नंतरच्या प्रवेशाकरिता आवश्यक ते दाखले तातडीने वितरीत करण्याबाबत स्थानिक लोक प्रतिनिधींचे निवेदन जिल्हाधिकारी, सोलापूर यांना प्राप्त झाले आहे.

त्यानुसार सोलापूर जिल्हयातील इयत्ता १० वी व १२ वी नंतरच्या प्रवेशाकरिता आवश्यक ते दाखले देण्याकरिता जिल्हयातील उपविभागीय अधिकारी यांना प्रवेश पात्र विद्यार्थ्याचे जातीचे दाखले, नॉन क्रिमिलेअर दाखले दि. १९.०६.२०१८ पर्यंत तयार करुन संबंधिताना मिळण्याची व्यवस्था करण्यात यावी तसेच सदर कालावधीत कोणताही विद्यार्थी प्रवेशा पासून वंचित राहू नये व त्यांच्या पालकांची आर्थिक पिळवणूक होणार नाही. याबाबत आवश्यक त्या उपाययोजना करण्यात याव्यात अशा सूचना जिल्हास्तरावरुन देण्यात आल्या होत्या.

सोलापूर जिल्हयातील सर्व सेतू सुविधा केंद्रे ही दि. १६.०६.२०१८ व दि. १७.०६.२०१८ (शासकीय सुटी) रोजी सुरु ठेवण्यात आली होती. सदर सेतू सविधा केंद्रामध्ये अतिरिक्त काऊंटर उघडून त्या माध्यमातून दाखले वितरीत करण्यात आले.

सोलापूर जिल्हयामध्ये दाखल्या अभावी प्रवेशापासून विद्यार्थी वंचित राहिल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला येथील औद्योगिक वसाहतील गोदामामधील विविध बनावट बियाणे विक्री होत असल्याबाबत**

**(४७) १२६२९७ (०२-०८-२०१८). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील औद्योगिक वसाहतीच्या गोदामामधील विविध बियाणे कंपन्यांचे कपाशी बियाण्यांचे वाण अप्रमाणित असल्याने सदर बियाणांची विक्री थांबविण्याचे आदेश कृषी सह संचालक व गुणवत्ता नियंत्रण अधिकारी यांनी दिनांक ११ जून २०१८ रोजी वा त्यासुमारास अकोला, कृषी विभागाला दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बियाणे अप्रमाणित असल्याचा अहवाल नागपूर येथील प्रयोग शाळेने सादर केला तसेच कृषी विभागाची कारवाई न झाल्याने सदर बियाणे कृषी केंद्रांमार्फत विकल्या गेल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित दोषीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) अकोला येथील औद्योगिक वसाहतीमधील कापूस बियाणे कंपनीच्या अधिकृत परवानाधारक गोदामामधून कापूस बियाणांचे नमुने तपासणीकरीता काढण्यात आले असून सदर नमुने बीज परीक्षण प्रयोगशाळा, नागपूर येथे तपासणी करीता पाठविण्यात आलेले होते. सदर नमुन्यांपैकी न्युझीविडू बियाणे कंपनीचे ४, प्रभात बियाणे कंपनीचे १, तुलसी बियाणे कंपनीचे १ व राशी बियाणे कंपनीचे १ असे एकूण ७ नमुने अप्रमाणित घोषित झाले होते. सदर अप्रमाणित नमुन्यांवर कायद्यातील तरतुदीनुसार कार्यवाही चालू असून सदर बियाणे कंपनींवर अकोला येथील न्यायालयामध्ये कोर्ट केसेस दाखल करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदिया व भंडारा जिल्हयात गौण खनिजांची अवैध वाहतूक होत असल्याबाबत**

**(४८) १२६३१२ (२०-०७-२०१८). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया व भंडारा जिल्हयात वाहतूक नियमांची पायमल्ली करून ट्रक व ट्रॅक्टरद्वारे मोठ्या प्रमाणात गौण खनिजांची वाहतूक केली जात असून वाहतुकीदरम्यान या वाहनावर ताडपत्री न झाकल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास हानी पोहोचत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करून यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१८) :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर येथील सांगली फाटा महामार्गावरील अपघातग्रस्त ठिकाणांबाबत**

**(४९) १२६३४५ (२०-०७-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील सांगली फाटा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम सन २००२ मध्ये सुरु होऊन सन २००६ मध्ये पूर्ण झाले असतानाही महामार्गावरील अपघात क्षेत्रे त्याच स्थितीत राहिली असल्याचे माहे जुन, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सांगली फाटयावर महामार्गाला लागूनच वाळू मार्केट असल्याने वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असून पंधराशेपेक्षा जास्त मालवाहतूक गाडया वाहतूक करित असतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या महामार्गावर गत सहा वर्षात १७० अपघात झाले असून स्थानिक पोलिसांच्या यादीत महामार्गावर सतत अपघात घडणारी ठिकाणे ब्लॅक स्पॉट म्हणून गणली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करून अपघातग्रस्त ठिकाणी अपघात घडू नये म्हणून उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-०९-२०१८) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) ही बाब निदर्शनास आली नाही.
(३) अपर पोलीस महासंचालक वाहतूक यांच्या २०१७ च्या अहवालानुसार सातारा (शेंद्र सुतगिरणी) ते कागल या महामार्गाच्या लांबीत कोल्हापूर जिल्हयात १३, सांगली जिल्हयात १२ व सातारा जिल्हयात ६ ब्लॅकस्पॉट आहेत. त्याची तातडीने उपाययोजना महामंडळामार्फत करण्यात आली आहे.
(४) अपघातग्रस्त ठिकाणी तातडीच्या स्वरुपाची उपाययोजना म्हणून सोलर ब्लिंकर्स, थर्मोप्लास्टिक पेंटने पट्टे मारणे, रंम्बलर स्ट्रिप आवश्यक ते परावर्तीत फलक, डेलीनेटर, कॅट आईज, इ. बसविणेत आले आहेत. कायम स्वरुपी उपाययोजना महामार्गाच्या सहापदरीकरणा अंतर्गत राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण मार्फत प्रस्तावित आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हाधिकारी यांनी गौण खनिज उत्खनन प्रकरणी आदेश पारित करण्याबाबत**

**(५०) १२६३६७ (२०-०७-२०१८). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपर आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांच्या दिनांक ९ जून, २०१५ रोजीच्या निर्णयाविरुद्ध कस्तुरीमृग फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष यांनी दिनांक २७ सप्टेंबर, २०१६ रोजी मा.महसूल मंत्री यांचे न्यायालयात अपील दाखल केले आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रधान सचिव व विशेष कार्यकारी अधिकारी (अ व रि) यांनी दिनांक २२ जून, २०१७ रोजी दिलेल्या आदेशात अपर आयुक्त कोकण विभाग मुंबई यांचे दिनांक ०९ जून, २०१५ रोजीचे आदेश रद्द केले आहे , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी पथकाची निर्मिती करून प्रत्यक्ष स्थळपाहणी करून संबंधित कंपनीने केलेल्या गौणखनिजाच्या एकूण उत्खननापैकी किती ब्रास गौण खनिजाचा सपाटीकरणासाठी आणि किती गौण खनिजाचा इतर कामाकरीता उपयोग केला आहे याची अचूक गणना करावी असे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रधान सचिव व विशेष कार्यकारी अधिकारी (अ व रि) यांनी दिनांक २२ जून, २०१७ रोजी आदेश दिल्यानंतर एक वर्षाचा कालावधी झाला असतानाही जिल्हाधिकारी, रत्नागिरी या प्रकरणी कारणमीमांसेसह आदेश पारीत करण्यास टाळाटाळ करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी आदेश पारीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-१०-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) व (५) मे.जे.एस.डब्ल्यू.जयगड या कंपनीने त्यांचेविरुध्द केलेल्या दंडात्मक कारवाईविरुध्द मा.मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली असून मा.उच्च न्यायालयाने "जैसे थे" परिस्थिती ठेवण्याचे आदेश दिले असून प्रकरण मा. उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**

**मुंबई.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.